महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०४/०८/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### चोरी

**१) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील एन.सी.सी. कॅम्प मकरधोकडा माईन्स येथे दिनांक २३/०७/२०२२ चे १८.०० वा. ते दिनांक २५/०७/२०२२ चे ०८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— श्रीनिवास राव मस्तानराव पावनगंटी, वय ५५ वर्ष, रा. एन.सी.सी. कॅम्प मकरधोकडा माईन्स ०१ उमरेड हे एन.सी.सी. कॅम्प मकरधोकडा माईन्स ०१ उमरेड येथे अकाडंट मॅनेजर पदावर काम करतात. त्यांचे ऑफीस एन.सी.सी. कॅम्प ला असून ऑफीस मध्ये कंपनीचे व्यवहारचा कॅशबॉकस असून कॅशबॉक्स टिनाचे अलमारीत ठेवून चाबी असीस्टंट मॅनेजर राजेश्वरराव यांचेकडे राहते. तसेच अनंतक्रिष्णा अकाउंट मॅनेजर यांचेकडे राहते दि. २३/०७/२२ रोजी ऑफीस मध्ये दिवसभरचा हिसाब करून ३२,७२१/—रूपये कॅशबॉक्स मध्ये ठेवून अलमारीत ठेवले व तिघेही निघून गेले. दि. २५/०७/२०२२ चे सकाळी ०८.०० वा. दरम्यान ऑफीसमध्ये गेल्यानंतर मेसचे भाजीपाल्याकरीता पेसे देणेकरीता फिर्यादीने अलमारी खोलली तेव्हा अलमारीचा लॉक खुला होता व कॅशबॉक्स नव्हता स्टॉफचे कर्मचारींना विचारपूस केली अज्ञात आरोपीने ऑफीसचे खिडकीची ग्रील तोडून ऑफीसचे आत प्रवेश करून १) गोदरेज कंपनीचा कॅशबॉक्स कि, २,०००/—रू, २) नगदी ३२,७२१/—रूपये असा एकुण कि. ३४,७२१/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अजितसिंग ठाकुर मो.नं. ९४२३६००५५६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा मनसर येथे दिनांक ०३/०७/२०२२ चे ०१.०० वा. ते ०२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— मुकेश सर्जेराव भागढकर, वय ४७ वर्षे, रा. इंदिरा नगर, कन्हान यांचे मोटार पंप दुरूस्तीचे बंद दुकानाचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने दुकानातील १) जुना जळाळेला तांब्याचा तार ६० किलो की. १५,०००/—रू., २) फॅन स्टेटर ५ नग कि. ४,०००/—रू. ३) समर्सिबल पंप २ कि. १०,०००/—रू., ४) मोनाब्लॉक पंप ४ की. ३,०००/—रू. असा एकुण कि. ३२,०००/—रू. चा मुद्देमाल तसेच फिर्यादीचे दुकाना समोरील रोडाच्या पलीकडे हिफजुर महफुजुर रहमान यांचे आर.पटेल ऑटो इलेक्ट्रीक चे दुकानातुन १) जुना जळाळेला तांब्याचा तार १० किलो की. ३,०००/—रू., २) जुने आरमीचर ८ नग की. ३,०००/—रू., ३) फोर व्हिलरचे जुने सेल्फ ४ नग की. १२,०००/—रू. असा एकुण कि. २०,०००/—रू. असे दोन्ही दुकानाचे सामान एकुण कि. ५२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८०, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गजानन ऊकेबोंद्रे मो.क्र. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील तारसा चौकामधील महाकाली कॉम्पलेक्सच्या वरती येथे दिनांक ०३/०८/२०२२ चे २३.०० वा. ते दिनांक ०४/०८/२०२२ चे ०९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सुनिल नारायण पिल्ले, वय ४१ वर्ष रा. पटेल नगर, हनुमान मंदीराजवळ कन्हान यांनी महाकाली कॉम्पलेक्स च्या वरती १५/२० चे असे दोन जाहीरात होल्डींग लावण्यात आले होते. त्यापैकी १) सी चॅनल हेवी वेट १३८ किमी प्रत्येकी वजनाचे १२ नग प्रती किलो ५३.५० रु. प्रमाने एकुण किंमत ७२०३६/–रू., २) ५५/५ एंगल २० फुट लांबीचे ११८ किलो वजनाचे १८ नग प्रती किलो ४२.५० एकुण किंमत १४०४८०/–रू., ३) ४५/५ एंगल २० फुट ९८ किलो वजनाचे २२ नग प्रती किलो ५३/–रू. एकुण किंमत ९२,७०८/–रू., ४) ६५/५ एंगल २० फुट १२८ किलो वजनाचे १४ नग प्रती किलो ५२.५०/–रू. एकुण किंमत ७६,१६०/–रू., ५) डबल वार ३ मीट बोल्ट ३० किमी वजनाचे किमती ३२/–रू., प्रमाणे एकुण किमंत ९६०/–रू., ६) जी बलेम १६ १२ किमी वजनाचे किमती ९०/–रू., प्रमाणे एकुण किं. १०८०/–रू., चे असा वरील सर्व मालाची किंमत ३,८३,३६४/–रु. ऐवढा होता. त्यापैकी १० एंगल वाचले किं. ५३,०००/–रु. चा माल वाचला व ३,३०,३६४/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रामटेके मो.नं. ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. जलालखेडा** :– दिनांक ०३/०८/२०२२ चे १३.०० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १७ वर्ष ही कॉलेजला १२ व्या वर्गात शिकत असुन ती आपल्या मैत्रीनीसह कॉलेज सुटल्यानंतर फोटो स्टुडीओ जलालखेडा चे बाहेर १३.०० वा. आली. त्यादरम्यान आरोपी नामे– वैभव विजय ईगळे, वय २१ वर्ष, रा. आंबेडकर चैक, वरूड वार्ड क्र. २२ त. वरूड जि. अमरावती हा फिर्यादी जवळ आला व त्याने तीला 'तु माझ्या सोबत का बोलत नाही, तुला माझ्याशी लग्न करायचे नाही काय, मी तुझे लग्न दुसऱ्याशी होउ देनार नाही' अशी धमकी देवु लागला. तेव्हा तीने त्याला म्हटले की, 'मला तुझ्याशी बोलायचे नाही तसेच तुझ्या सोबत माझा कोणताही संपर्क नाही' असे त्यास बोलली असता त्याने तीच्या गालावर डाव्या भागास एक थापड मारली व तो तेथुन निघुन गेला. फिर्यादीचा आरोपी सोबत काहीही सबंध ठेवन्याची ईच्छा नसतांना तो तिचा पाठलाग करीत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ड)१,१, ३५४ ड), २, ५०६ भादवी सहकलम ११(४)१२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी मनोज चौधरी मो.नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**